ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{By-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

# 'बलात्कार' महीला विरोधी गुन्हयाच्या प्रकारातील एक गंभीर गुन्हयाचा समाजशास्त्रीय अभ्यास

प्रा. दशरथ जाधव,
सहाय्यक प्राध्यापक,
समाजशास्त्र विभाग,
एस. एन. डी. टी. महिला विद्यापीठ, मुंबई.

*सारांश –*

*संबंधित लेखन दैनंदिन वर्तमानपत्रातील बातम्यांच्या माहितीनुसार बनविण्यात आलेला असून, बलात्काराचे वाढते प्रमाण महिला स्वातंत्र्याला भयभीत करणारा आहे. दिवसें दिवस महिला किती असुरक्षीत होत चालली आहे. याचा परामर्श या लेखनामध्ये घेण्यात आलेला आहे. आज महिला स्वत:ला घरात सुध्दा असुरक्षित असल्याचे निष्कर्ष या दैनंदिन बातम्यातून स्पष्ट होते. कुंपनच गवत खात असेल तर, गवताने ग–हाणे कोणास सांगावे. हि अवस्था बलात्काराच्या गुन्हयाच्या प्रकारातून स्पष्ट होते.*

**मुख्य संज्ञा –** बलात्कार गुन्हा, समाजशास्त्रीय अभ्यास

**गुन्हेगारीशास्त्र –**

मानवी समाजामध्ये गुन्हेगारी ही अटळ आणि अपरिहार्य घटना असून पृथ्वीतलावरील कोणताही समाज गुन्हेगारी मुक्त नाही असे एमिल डुरखाईम या प्रख्यात समाजशास्त्रज्ञांनी म्हटले आहे. प्रत्येक समाजातील मूल्ये, नीतीसंहिता, आदर्शाच्या कल्पना या वेगळया असतात. गुन्हेगारी वर्तनाचा संबंध याच बाबींशी असतो. साहजिकच प्रत्येक समाजातील गुन्हेगारी, तिचे स्वरुप, प्रकार, तीव्रता वैशिष्टये इत्यादीत फरक असतो. पण या ना त्या स्वरुपात गुन्हेगारी घडतच असते.

अठराव्या शतकामध्ये युरोपमधील डॉक्टर्स, भौतिक शास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ तसेच इतर अभ्यासकांनी

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{By-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

गुन्हेगारीसंबंधी विशेष अध्ययन करुन महत्वपूर्ण योगदान केले. या काळातील अभ्यासकांनी गुन्हेगारी वर्तनाचा अभ्यास मुख्यत: जीवशास्त्रीय दृष्टिकोनातून केला. तथापि कालांतराने गुन्हेगारी वर्तनाचा भौगोलिक, मानसशास्त्रीय, शारिरीक – सांस्कृतिक दृष्टिकोणातून अभ्यास केला.

स्वातंत्रोत्तर काळात भारतात औद्योगिकरण आणि नागरिकरणाच्या प्रक्रियेला चालना मिळाली. एकूण गुन्हेगारीमध्ये स्त्रियांसंबंधी होणा–या गुन्हयांमध्ये वाढ होवू लागली. तसेच स्त्री गुन्हेगारांचेही प्रमाण वाढले. साहजिकच अभ्यासकांना गुन्हेगारीतील स्त्रियांचा सहभाग, स्त्री गुन्हेगार इत्यादींचा अभ्यास करणे आवश्यक वाटू लागले. स्त्रियांसबंधींची होणा–या गुन्हयात मुख्यत: लैगिंक गुन्हे, वेश्याव्यवसाय, कॉल गर्ल्स, स्त्रियांचा अनैतिक व्यापार, हुंडाबळी, स्त्रियांवरील अत्याचार यांचा अभ्यास झाला.

**गुन्हेगारीशास्त्राची व्याख्या –**

१. **वेबस्टर –**

गुन्हेगारीशास्त्र म्हणजे गुन्हयांचा सामाजिक घटना म्हणून शास्त्रीय पद्धतीने अभ्यास करणे होय. त्यामध्ये गुन्हेगार, त्यांची मानसिक लक्षणे, त्यांच्या सवयी, त्यांची शिस्त इ. अभ्यास अंतर्भूत आहे.

२. **इलियर मेरिल –**

गुन्हे आणि त्यावरील उपचारांचा शास्त्रीय अभ्यास.

३. **मायकेल आणि ॲडलर –**

गुनहेगारी वर्तनाचा अभ्यास म्हणे गुन्हेगारीशास्त्र होय.

**अर्थ व स्वरुप –**

‘ क्राईम ’ हया लॅटीन शब्दापासून ‘ क्रिमीलॉजी ’ हा शब्द बनला आहे. ‘ लॉजी ’ या शब्दाचा अर्थ अभ्यास स्टडी असा आहे. या दोन शब्दापासून ‘ क्रिमीलॉजी ’ हा शब्द बनला आहे. त्याचा अर्थ गुन्हेगारीशास्त्रीय अभ्यास करणारे शास्त्र असा आहे.

**लैगिंक गुन्हे –**

भारतीय दंडविधान संहितेमध्ये वेगवेगळे लैगिंक गुन्हे स्पष्ट केले आहेत. तहान, भूक इतकीच तारुण्यसुलभ अशी लैंगिक भावना ही सर्व प्राणिमात्रांमध्ये उपजतच असते. मानव प्राणी त्याला अपवाद नाही. तथापि धर्म, नैतिकता, कायदा किंवा एकूणच सामाजिक धर्म नियमांनी मानवी लैगिंक जीवन नियंत्रित केलेले आहे. दोन भिन्न लिंगीय व्यक्तींच्या लैगिंक संबंधांना समाजाने मान्यता दिली की अशा संबंधांना सामाजिक तसेच कायदेशीर मान्यता मिळते. मात्र समाजाच्या आणि कायद्याच्या विरोधात जावून जेव्हा एखादे लैगिंक वर्तन घडते, तेव्हा ते लैगिंक गुन्हे या संज्ञेस पात्र होते.

लैगिंक गुन्हयाचे प्रकार –

१. **बलात्कार –**

जगाच्या पाठीवर सर्व समाजामध्ये बलात्काराच्या घटना घडत असतात. या शब्दाची शब्दकोशातील व्याख्या ‘ एखाद्या स्त्रिच्या संमतीविना तिच्याशी बेकायदेशीर लैगिंक संबंध पस्थापित करणे म्हणजे बलात्कार होय.

भारतीय दंडविधान संहितेच्या कलम ३७५ मध्ये बलात्कारीच व्याख्या विस्तृतपणे केलेली आहे. जेव्हा एखादा व्यक्ती स्त्रीच्या इच्छेविरुध्द, तिच्या मुक्त संमतीविना, धाक दपटशा दाखवून, जिवे मारण्याची भिती दाखवमन तिची संमती मिळवून, जर त्या पुरुषाला आपण या स्त्रीचा पती नाही हे माहित असूनही त्या स्त्रीने हा आपला कायदेशीर पती आहे अशा समजुतीतून संभोगास परवानगी दिली असेल तर, वस्तुस्थितीच्या गैरसमजातून त्या स्त्रीने संमती दिली असतांना आणि तिचे वय जर १६ असल तर तिच्याशी लैगिक संबंध प्रस्थापित केले जाते त्याला बलात्कार असे म्हणतात.

**बलात्काराची कारणे –**

१. औद्योगिकरण आणि कुटूबसंस्थेचे विघटन.

२. धर्म आणि नैतिकतेच्या कल्पना बदलू लागल्या.

३. नागरीकरणातून उद्‌भवलेल्या समस्या.

ISSN : 2278 – 5639
Global Online Electronic International Interdisciplinary Research Journal (GOEIIRJ)
{By-Monthly} Volume – II, Issue – IV December 2013

४. कामुकतेचे प्रदर्शन.

५. विवाहाचे वाढते वय.

६. स्त्री – स्वातंत्राच्या चुकीच्या कल्पना.

**बलात्कार व लैगिंक गुन्हे संबंधिचे कायदे –**

१. बलात्काराच्या गुन्हयासाठी ३७६ व्या कलमानुसार जन्मठेपेची शिक्षा होवू शकते व दंडही केला जातो. तसेच बलात्काराच्या गांभीर्यानुसार शिक्षा ही बदलू शकते.

२. भारतीय दंडविधान संहितेचे कलम ३५४ प्रमाणे एखाद्या स्त्रीचा विनयभंग करणे त्यासाठी बळाचा वापर करणे, हल्ला करणे हा गुन्हा मानला आहे.

३. भारतीय दंडविधान संहितेत कलम ३७२ आणि ३७३ प्रमाणे अज्ञान मुलींना वेश्याव्यवसाय लावण्याच्या हेतूने त्यांची खरेदी, विक्री करणे हा ही गुन्हा मानला आहे. या गुन्हयासाठी १० वर्ष कारावासाची आणि दंडाची शिक्षा होवू शकते.

४. अनैसर्गिक लैगिंक गुन्हे करणा–या व्यक्तीस भारतीय दंडविधान संहितेचे कलम ३७७ प्रमाणे व्यक्तीस जन्मठेपेची शिक्षा होवू शकते.

५. भारतीय दंडविधान ४९८ प्रमाणे एखाद्या स्त्रीला अनैतिक संबंधाच्या उद्देशाने फूस लावून पळवून नेणे हा गुन्हा असून त्याला २ वर्षापर्यंत कारावास आणि दंडाची शिक्षा होवू शकते.

६. भारतीय दंडविधान च्या ४९७ प्रमाणे एखाद्या पुरुषाने एखाद्या विवाहीत स्त्रीशी ती आपली पत्नी नाही किवा ती दुस–याची पत्नी आहे हे माहित असूनही तिच्याशी लैगिंक संबंध ठेवले तर तो गुन्हा होतो आणि ५ वर्ष कारावास आणि दंडाची शिक्षा होवू शकते.

७. याशिवाय १८ वर्षाखालील मुलीचे अपहरण करणे हा कलम ९६३ प्रमाणे, एखाद्या स्त्रीचे तिच्या इच्छेविरुध्द जबरदस्ती विवाह करण्याच्या हेतून किंवा लैगिंक संबंध ठेवण्याच्या हेतूने अपहरण करणे हा कलम ३६६ प्रमाणे गुन्हा मानला आहे.

**शिफारशी –**

१. बलात्कारासारखे दृष्कृत्य करणा—या डॉक्टरांना निलंबत केले पाहिजे व त्यांची पदवी रदद् केली पाहीजे.

२. शैक्षणिक संस्थामध्ये मुलींना स्वसंरक्षण / मार्शल आर्टचे प्रशिक्षण देणे उपयोगी ठरु शकेल.

३. समाजाची / वडीलांची मानसिकता बदलणे गरजेचे आहे.

४. स्त्रियांनी / मुलींनी ओळखीच्या / अनोळखी व्यक्तिस भेटण्याकरिता एकटे जावू नये.

५. पालकांनी मुलांसमारे भांडू नये. तसेच जन्म देत्या पित्याने बलात्कार केला असेल तर त्याला ताबडतोब फाशीच दिली पाहीजे.

६. महिला व तरुणींनी बलात्कार व छेडखानीचे प्रकार वाढत असल्यामुळे स्वत:ला सक्षम, सशक्त व सबल करण्यासाठी कराटे, योगासन, लाठी चालविणे इ. प्रतिकारक्षम पाठ घेवून स्वत:ला संरक्षित केले पाहीजे.

७. पालकांनी आपल्या फायद्यासाठी मुलींचा अनैतिक वापर करु नये.

८. समाजाने बघ्याची भूमिका टाळावी. समाजाच्या बघ्याच्या भूमिकेमुळे महिलांवर अत्याचाराच्या घटना घडतात. या घटना घडू नये म्हणून सामाजिक संगठन करावे, सामाजिक प्रतिकार, सामाजिक बहिष्कारासारखी शस्त्र उचलली तर महिलांवरील बलात्कार थांबतील. समाजात सुस्थिती निर्माण होईल.

१०. पालकांनी अत्यंत अल्पवयीन मुलीला बाहेर एकटे सोडू नये.

११. आजच्या युवती व काही महिलांमध्ये सुध्दा आपल्या चंचल मनाला नियंत्रित केले पाहीजे.

१२. तृतीयपंथींवर अत्याचार करणा—याला कठोर शिक्षा केली पाहीजे.

१३. महिलांनी संघटीत होण्याची गरज आहे.

**संदर्भ सूची –**

१. गुन्हेगारी शास्त्र, माणिक चंद्रकांत माने

२. दैनिक पुढारी

३. दैनिक लोकासत्ता

४. दैनिक लोकमत

५. दैनिक पुण्यनगरी

६. दैनिक मुंबई चौफेर

७. दैनिक संध्याकाळ